कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम मधील अशी शेतजमीन खरेदी/ विक्री अनुषंगाने जिल्हाधिकारी यांच्या पुर्वपरवानगी विषयक तरतुदीतील सुधारणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः टिएनसी-०४/२०१३/प्र.क्र.१९६/ज-१
जागतिक व्यापर केंद्र, सेंटर-वन इमारत
कफ परेड,मुंबई-४०० ००५
दिनांक : ११ फेब्रुवारी, २०१४

वाचा -

१) मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ४३
२) हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९५० चे कलम ५० (ब)
३) मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश ) अधिनियम १९५८ चे कलम -५७
४) विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्रमांक १६६/बी, दिनांक ०७.०२.२०१४
५) महाराष्ट्र शासन राजपत्र (असाधारण) भाग-चार व भाग-आठ, दिनांक ०७.०२.२०१४

प्रस्तावना -

मुंबई कुळवहिवाट व शेत जमीन अधिनियम, १९४८ च्या कलम-४३ मध्ये, हैद्राबाद कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम, १९५० च्या कलम-५०(ब) मध्ये व मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ विभाग) अधिनियम, १९५८ च्या कलम-५७ मध्ये कुळ हक्काने मिळालेल्या जमीनी विक्री करण्यापूर्वी जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेण्याची तरतूद आहे. मुंबई कुळवहिवाट व शेत जमीन अधिनियम, १९४८ च्या कलम-४३, हैद्राबाद कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम, १९५० च्या कलम-५०(ब) व मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ विभाग) अधिनियम, १९५८ च्या कलम-५७ नुसार कुळहक्काने मिळालेली जमीन जिल्हाधिका-यांच्या पूर्व मंजूरीशिवाय विक्री करुन, देणगी देऊन, अदलाबदल करुन, गहाण देऊन किंवा पट्टयाने देऊन हस्तांतरीत करता येत नाही. महाराष्ट्र राज्यात कुळकायदा अंमलात येते वेळी बहुतांशी मोठे जमीनदार हे प्रत्यक्षात शेतजमीनी कसत नव्हते, शेतजमीनी कसणा-या व्यक्ती वेगळयाच होत्या व त्यामुळे अशा कसणा-या व्यक्तींना संरक्षण देणे या सामाजिक हेतूने उपरोक्त तीनही कुळकायदे अंमलात आले आहेत व त्याअनुषंगाने सदरहू कायद्यात तरतुदी विहीत केलेल्या आहेत. परंतु, कालानुरुप या परिस्थितीमध्ये बदल झाला असून, मोठे जमीनदार राहिलेले नाहीत व अशा परिस्थितीमुळे जमीनी विक्री करताना असलेली बंधने त्यावेळच्या कुळहक्काने जमीनी मिळालेल्या कब्जेदारांवर लादण्यासारखे होईल. याशिवाय अशा जमीनी विकताना कुळकायद्यातील संबंधीत

तरतुदीमुळे कालापव्यय होतो व पर्यायाने सदरहू कब्जेदारास या जमीनी विक्री करावयाच्या झाल्यास अनेक समस्यांचा सामना करावा लागतो ही बाब विचारात घेऊन, उपरोक्त कुळकायद्यातील संबंधीत कलमानुसार असलेली जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगीची अट शिथील करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. त्या अनुषंगाने, ज्या जमिनी कुळकायद्यातील तरतुदीनुसार कुळहक्क मान्य होऊन कुळांनी खरेदी केलेल्या आहेत, अशा खरेदीच्या दिनांकापासून १० वर्षे पूर्ण झालेल्या जमीनींची खरेदी-विक्री करताना जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगीची आवश्यकता राहणार नाही तथापि, या विक्री व्यवहारापोटी शासनास जमा करावयाची आवश्यक ती नजराण्याची रक्कम खरेदीदाराने खरेदीच्या पूर्वी शासन जमा करावी  व ही शिथीलता फक्त या कायद्यातील इतर तरतूदी तशाच ठेवून जिल्हाधिकारी यांचेकडून घेण्यात यावयाच्या पूर्व परवानगीच्या संबंधात फक्त विक्री परवानगी पुरतीच' मर्यादित असेल, अशी सुधारणा उपरोक्त तीनही कुळकायद्यात करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव मंत्रीमंडळ बैठकीसमोर सादर करण्यात आला. मा.मंत्रीमंडळाने उक्त अधिनियमात सदर सुधारणा करण्याकरिता दिनांक- ०२.०५.२०१२ रोजी च्या बैठकीत मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त अधिनियम अंमलात येऊन, जवळपास पाच दशकापेक्षां जास्त कालावधी झालेला आहे. कुळकायद्यातील विक्री परवानगीची प्रचलित प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी व संबंधीत खातेदारांना त्यांच्या जमीनीच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार अधिक विलंब न लागता पूर्ण करता यावेत या उद्देशाने जिल्हाधिका-यांच्या पूर्व परवानगीची अट शिथिल करण्याचे विधेयक सन २०१२ च्या पावसाळी अधिवेशन समयी दोन्ही सभागृहासमोर मांडण्यात आले. त्याअनुषंगाने, "उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार ज्या जमिनी कुळकायद्यातील तरतुदीनुसार कुळहक्क मान्य होऊन कुळांनी खरेदी केलेल्या आहेत, अशा खरेदीच्या दिनांकापासून १० वर्षे पूर्ण झालेल्या जमीनींची खरेदी-विक्री /देणगी/अदलाबदल/गहाण ठेवणे/ती पटटयाने देणे/अभिहस्तांतरण करणे याकरिता जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगीची आवश्यकता राहणार नाही", अशी सुधारणा खालील अटींवर करण्याची बाब या विधेयकात आहे. या अटी पुढीलप्रमाणे :-  या विक्री व्यवहारापोटी शासनास जमा करावयाची आवश्यक ती नजराण्याची रक्कम (शेतसा-याच्या ४० पट) खरेदीदाराने खरेदीच्या पूर्वी शासन जमा करणे आवश्यक राहील,. संबंधीत खरेदीदार हा शेतकरी असला पाहिजे. तसेच खरेदीदाराकडे महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ मध्ये विहित केलेल्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त धारण जमीन होणार नाही. मुंबईचा जमीनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबतचा अधिनियम १९४७ यांच्या तरतूदीचे उल्लघंन केले जाणार नाही. सदर विधेयक विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाने सन २०१२ च्या पावसाळी अधिवेशनात संमत केले आहे.  त्याअन्वये  उचित कार्यवाहीअंती सदर सुधारणेनुषंगिक सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर

सुधारणा अधिनियम सर्व संबंधित क्षेत्रिय यंत्रणांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविणे आवश्यक झाले आहे.

<u>शासन परिपत्रक</u>

उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक ५ येथे नमद महाराष्ट्र शासन राजपत्र (असाधारण) भाग-चार व भाग-आठ, दिनांक ०७.०२.२०१४ अन्वये सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ हा मराठी व इंग्रजी भाषेत प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर अधिनियमातील तरतुद खालील प्रमाणे आहे.

१) मुंबई कुळवहिवाट व शेत जमीन अधिनियम, १९४८ च्या कलम-४३, हैद्राबाद कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम, १९५० च्या कलम-५०(ब) व मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ विभाग) अधिनियम, १९५८ च्या कलम-५७ या कलमांच्या पोटकलम-(१) मध्ये, विद्यमान परंतुकानंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात आले आहे.

   परंतु आणखी असे की, या पोट कलमात नमुद केलेल्या कलमांन्वये ज्या जमिनीच्या संबंधात तिच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या दिनांकांपासून १० वर्षाचा काळ लोटला असेल, अशा जमिनींच्या बाबतीत, तिची विक्री करण्याकरीता, ती देणगी देण्याकरीता, तिची अदलाबदल करण्याकरीता, ती गहाण ठेवण्याकरीता, ती पटटयाने देण्याकरीता, किंवा तिचे अभिहस्तांकन करण्याकरीता पुढील शर्तीस अधिन राहून, अशा कोणत्याही पुर्वमंजूरीची आवश्यकता असणार नाही -

   (क) शेतजमीनीची विक्री करण्यापूर्वी, विक्रेता जमीन महसूल आकारणीच्या ४० पट इतकी नजराणा रक्कम शासनाला देईल,

   (ख) खरेदीदार हा शेतकरी असला पाहिजे,

   (ग) खरेदीदार हा महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ अन्वये अनुज्ञेय असलेल्या कमाल क्षेत्रापेक्षा अधिक जमीन धारण करणार नाही, आणि

   (घ) मुंबईचा जमीनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबतचा अधिनियम १९४७ यांच्या तरतूदीचे उल्लघंन केले जाणार नाही.

२) उपरोक्त नमुद सुधारणेबाबतच्या दिनांक ०७.०२.२०१४ रोजीच्या शासन राजपत्राच्या मराठी व इंग्रजी प्रती पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडल्या आहेत.

३) सदर सुधारणेस पुरेशी प्रसिध्द देण्यात येऊन याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२१११६१४४७५४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shivraj Shrikant Patil

Digitally signed by Shivraj Shrikant Patil
DN: CN = Shivraj Shrikant Patil, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = REVENUE AND FOREST
Date: 2014.02.11 17:02:07 +05'30'

एस.एस.पाटील
शासनाचे उप सचिव

<u>प्रत,</u>

१. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव,राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव./वि.का.अ., मंत्रालय, मुंबई-३२,
४. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव. वर्ल्ड ट्रेड सेंटर, ३२ वा मजला, मुंबई-०५,
५. महालेखापरीक्षक (लेखा/अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
६. महालेखा परिक्षक (लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर
७. मा.अ.मु.स.(महसूल) यांचे वि.का.अ.,महसूल व वन विभाग, वर्ल्ड ट्रेड सेंटर,३२ वा मजला,मुंबई.
८. प्रधान सचिव (विधी व परामर्शी) यांचे स्वीय सहायक, विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
९. प्रधान सचिव, विधान मंडळ सचिवालय, विधान भवन,मुंबई-३२
१०. सर्व मंत्रालयीन विभाग
११.सर्व विभागीय आयुक्त,
१२.जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३.सर्व जिल्हाधिकारी,/ सर्व अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय.
१४.सहसचिव/उपसचिव, महसूल व वन विभाग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, ३२ वा मजला, मुंबई-०५,
१५.उप सचिव (ब- शाखा), विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
१६.सर्व उप विभागीय अधिकारी/ सर्व तहसिलदार
१७. “ज” समूहातील, सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग मुंबई
१८. कक्ष अधिकारी/ल-१ सेल, महसूल व वन विभाग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, ३२ वा मजला, मुंबई
१९.निवडनस्ती(ज-१)

RNI No. MAHBIL /2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2014–16

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ५, अंक ३३]    शुक्रवार, फेब्रुवारी ७, २०१४/माघ १८, शके १९३५    [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.**—मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५० आणि मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रवेश) अधिनियम, १९५८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | पृष्ठे १-३ |

दिनांक २७ जानेवारी २०१४ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

**सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.**

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्र"** दिनांक ७ फेब्रुवारी २०१४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५० आणि मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, १९५८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९४८ चा मुंबई ६७. १९५० चा हैदराबाद २१. १९५८ चा मुंबई ९९.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८, हैदराबाद कुळवहिवाट अधिनियम, १९५० आणि मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, १९५८ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्रेसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक.**

संक्षिप्त नाव. १. या अधिनियमास, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन आणि मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) (सुधारणा) अधिनियम, २०१२ असे म्हणावे.

प्रकरण दोन

**मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ याची सुधारणा.**

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७ याच्या कलम ४३ ची सुधारणा. २. मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ याच्या कलम ४३ मधील, पोट-कलम (१) मध्ये, विद्यमान परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— १९४८ चा मुंबई ६७.

" परंतु आणखी असे की, या पोट-कलमात नमूद केलेल्या कलमांन्वये ज्या जमिनीच्या संबंधात तिच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या दिनांकापासून दहा वर्षांचा काळ लोटला असेल अशा जमिनीच्या बाबतीत, तिची विक्री करण्याकरिता, ती देणगी देण्याकरिता, तिची अदलाबदल करण्याकरिता, ती गहाण ठेवण्याकरिता, ती पट्ट्याने देण्याकरिता किंवा तिचे अभिहस्तांकन करण्याकरिता पुढील शर्तीस अधीन राहून, अशा कोणत्याही पूर्वमंजुरीची आवश्यकता असणार नाही,—

(क) शेतजमिनीची विक्री करण्यापूर्वी, विक्रेता जमीन महसूल आकारणीच्या चाळीस पट इतकी नजराणा रक्कम शासनाला देईल ;

(ख) खरेदीदार हा शेतकरी असेल ;

(ग) खरेदीदार हा महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ अन्वये अनुज्ञेय असलेल्या कमाल क्षेत्रापेक्षा अधिक जमीन धारण करणार नाही ; आणि १९६१ चा महा. २७.

(घ) मुंबईचा जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ याच्या तरतुदींचे उल्लंघन केले जाणार नाही.". १९४७ चा मुंबई ६२.

प्रकरण तीन

**हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५० याची सुधारणा.**

सन १९५० चा हैदराबाद अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ५०ब ची सुधारणा. ३. हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५० याच्या कलम ५०ब मधील, पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— १९५० चा हैदराबाद २१.

" परंतु, या पोट-कलमात नमूद केलेल्या कलमांन्वये ज्या जमिनीच्या संबंधात तिच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या दिनांकापासून दहा वर्षांचा काळ लोटला असेल अशा जमिनीच्या बाबतीत, तिची विक्री करण्याकरिता, ती देणगी देण्याकरिता, तिची अदलाबदल करण्याकरिता, ती गहाण ठेवण्याकरिता, ती पट्ट्याने देण्याकरिता किंवा तिचे अभिहस्तांकन करण्याकरिता पुढील शर्तीस अधीन राहून, अशा कोणत्याही पूर्वमंजुरीची आवश्यकता असणार नाही,—

(क) शेतजमिनीची विक्री करण्यापूर्वी, विक्रेता जमीन महसूल आकारणीच्या चाळीस पट इतकी नजराणा रक्कम शासनाला देईल ;

(ख) खरेदीदार हा शेतकरी असेल ;

१९६१ चा महा. २७. (ग) खरेदीदार हा महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ अन्वये अनुज्ञेय असलेल्या कमाल क्षेत्रापेक्षा अधिक जमीन धारण करणार नाही ; आणि

१९४७ चा मुंबई ६२. (घ) मुंबईचा जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ याच्या तरतुदींचे उल्लंघन केले जाणार नाही.".

प्रकरण चार

## मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, १९५८ याची सुधारणा.

१९५८ चा मुंबई ९९. **४.** मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, १९५८ याच्या कलम ५७ मधील, पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९९ याच्या कलम ५७ ची सुधारणा.

" परंतु, या पोट-कलमात नमूद केलेल्या कलमांन्वये ज्या जमिनीच्या संबंधात तिच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या दिनांकापासून दहा वर्षांचा काळ लोटला असेल अशा जमिनीच्या बाबतीत, तिची विक्री करण्याकरिता, ती देणगी देण्याकरिता, तिची अदलाबदल करण्याकरिता, ती गहाण ठेवण्याकरिता, ती पट्ट्याने देण्याकरिता किंवा तिचे अभिहस्तांकन करण्याकरिता पुढील शर्तीस अधीन राहून, अशा कोणत्याही पूर्व मंजुरीची आवश्यकता असणार नाही,—

(क) शेतजमिनीची विक्री करण्यापूर्वी, विक्रेता जमीन महसूल आकारणीच्या चाळीस पट इतकी नजराणा रक्कम शासनाला देईल ;

(ख) खरेदीदार हा शेतकरी असेल ;

१९६१ चा महा. २७. (ग) खरेदीदार हा महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ अन्वये अनुज्ञेय असलेल्या कमाल क्षेत्रापेक्षा अधिक जमीन धारण करणार नाही ; आणि

१९४७ चा मुंबई ६२. (घ) मुंबईचा जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ याच्या तरतुदींचे उल्लंघन केले जाणार नाही.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG /2009/35528
Reg. No. MH/MR/South-344/2014-16

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ५, अंक ५५] शुक्रवार, फेब्रुवारी ७, २०१४/माघ १८, शके १९३५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २७.००

**असाधारण क्रमांक ७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Tenancy and Agricultural Lands, the Hyderabad Tenancy and Agricultural Lands and the Bombay Tenancy and Agricultural Lands (Vidarbha Region) (Amendment) Act, 2012 (Mah. Act No. I of 2014), is hereby published under the authority of the Governor.

order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Principal Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

**MAHARASHTRA ACT No. I OF 2014.**

*(First published, after having received the assent of the President in the "Maharashtra Government Gazette" on the 7th February 2014).*

An Act

further to amend the Bombay Tenancy and Agricultural Lands Act, 1948, the Hyderabad Tenancy and Agricultural Lands Act, 1950 and the Bombay Tenancy and Agricultural Lands (Vidarbha Region) Act, 1958.

Bom. LXVII of 1948. Hyd. XXI of 1950. Bom. XCIX of 1958.

WHEREAS it is expedient further to amend the Bombay Tenancy and Agricultural Lands Act, 1948, the Hyderabad Tenancy and Agricultural Lands Act, 1950 and the Bombay Tenancy and Agricultural Lands (Vidarbha Region) Act, 1958, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Sixty-third Year of the Republic of India as follows :—

## CHAPTER I

### PRELIMINARY.

Short title. **1.** This Act may be called the Bombay Tenancy and Agricultural Lands, the Hyderabad Tenancy and Agricultural Lands and the Bombay Tenancy and Agricultural Lands (Vidarbha Region) (Amendment) Act, 2012.

## CHAPTER II

### AMENDMENT TO THE BOMBAY TENANCY AND AGRICULTURAL LANDS ACT, 1948.

Amendment of section 43 of Bom. LXVII of 1948. **2.** In section 43 of the Bombay Tenancy and Agricultural Lands Act, 1948, in sub-section (*1*), after the existing proviso, the following proviso shall be added, namely :— Bom. LXVII of 1948.

" Provided further that, no such previous sanction shall be necessary for the sale, gift, exchange, mortgage, lease or assignment of the land in respect of which ten years have elapsed from the date of purchase or sale of land under the sections mentioned in this sub-section, subject to the conditions that,—

(*a*) before selling the land, the seller shall pay a *nazarana* equal to forty times the assessment of the land revenue to the Government;

(*b*) the purchaser shall be an agriculturist;

(*c*) the purchaser shall not hold the land in excess of the ceiling area permissible under the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) Act, 1961 ; and Mah. XXVII of 1961.

(*d*) the provisions of the Bombay Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings Act, 1947 shall not be violated. ". Bom. LXII of 1947.

## CHAPTER III

### AMENDMENT TO THE HYDERABAD TENANCY AND AGRICULTURAL LANDS ACT, 1950.

Amendment of section 50B of Hyd. XXI of 1950. **3.** In section 50B of the Hyderabad Tenancy and Agricultural Lands Act, 1950, to sub-section (*1*), the following proviso shall be added, namely :— Hyd. XXI of 1950.

" Provided that, no such previous sanction shall be necessary for the sale, gift, exchange, mortgage, lease or assignment of the land in respect of which ten years have elapsed from the date of purchase or sale of land under the sections mentioned in this sub-section, subject to the conditions that,—

(*a*) before selling the land, the seller shall pay a *nazarana* equal to forty times the assessment of the land revenue to the Government;

(*b*) the purchaser shall be an agriculturist;

Mah. XXVII of 1961. (*c*) the purchaser shall not hold the land in excess of the ceiling area permissible under the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) Act, 1961 ; and

Bom. LXII of 1947. (*d*) the provisions of the Bombay Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings Act, 1947 shall not be violated. ".

## CHAPTER IV

### AMENDMENT TO THE BOMBAY TENANCY AND AGRICULTURAL LANDS (VIDARBHA REGION) ACT, 1958.

Bom. XCIX of 1958. 4. In section 57 of the Bombay Tenancy and Agricultural Lands (Vidarbha Region) Act, 1958, to sub-section (*1*), the following proviso shall be added, namely :— Amendment of section 57 of Bom. XCIX of 1958.

" Provided that, no such previous sanction shall be necessary for the sale, gift, exchange, mortgage, lease or assignment of the land in respect of which ten years have elapsed from the date of purchase or sale of land under the sections mentioned in this sub-section, subject to the conditions that,—

(*a*) before selling the land, the seller shall pay a *nazarana* equal to forty times the assessment of the land revenue to the Government ;

(*b*) the purchaser shall be an agriculturist ;

Mah. XXVII of 1961. (*c*) the purchaser shall not hold the land in excess of the ceiling area permissible under the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) Act, 1961 ; and

Bom. LXII of 1947. (*d*) the provisions of the Bombay Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings Act, 1947 shall not be violated. ".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.